**म.स.कौ.हि.का. अर्ज क्र. ११/२०२४.**
नेहा राहुले -विरुध्द- कंचन राहुले .
निशाणी क्र. १८ खाली

**अर्जदार यांचा उलटतपास गैरअर्जदार यांचे वकील श्री. के. जी. रामटेके यांच्यामार्फत शपथेवर सुरु -**

**१५.** माझे लग्न आई-वडीलांच्या मध्यस्थीने झाले होते. लग्नापुर्वी गैरअर्जदार क्र. १ व त्याच्या परीवाराची चौकशी आम्ही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, चौकशी दरम्यान गैरअर्जदार क्र. १ हा नौकरीवर असुन साधा-सरळ, निर्मळ व वरीष्ठ लोकांचा मान करणारा व्यक्ती आहे असे माहीत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, पुर्ण खात्री पटल्यानंतर आमचे लग्न लावण्यात आले होते. माझे शिक्षण बि.एस.सी. पर्यंत झाले आहे. मला पुढे शिकण्याची इच्छा नव्हती.

**१६.** लग्नानंतर मी स्वमर्जीने गैरअर्जदारासोबत किती महिने किंवा किती वर्ष नांदली हे माझ्या लक्षात नाही. आमच्या लग्नाला जवळपास ५,००,०००/- रुपये एवढा खर्च आला हे दर्शवीण्यासाठी मी अर्जासोबत कोणते दस्ताऐवज लावले आहे किंवा नाही हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर मला लागणाऱ्या सर्व गरजांची पुर्तता गैरअर्जदार क्र. १ ने केली होती.

**१७.** माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ ते ९ मध्ये केलेल्या आरोपांबद्दल मी माझ्या अर्जासोबत कोणते दस्ताऐवज दाखल केले आहे किंवा कसे हे मला माहीती नाही. मी माझ्या पुराव्यातील परिच्छेद क्र. ३ ते ९ मध्ये केलेल्या आरोपांबद्दल कोठे तक्रार केली आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा नौकरीवर होता व तो त्याच्या घरातील संपुर्ण जबाबदाऱ्या पार पाडुन नौकरीला जात होता. गैरअर्जदार क्र. १ हे सी-६० मध्ये कमांडो या पदावर होते. गैरअर्जदार क्र. १ चा ऑफीसला जाण्याचा व परत येण्याची वेळ निश्चीत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. १ यांचे कुटुंब एकत्र होते. हे

मला माहीत नाही की, गैरअर्जदार क्र. १ चे वडील मरण पावल्यामुळे त्याच्यावर त्याच्या कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या आल्या होत्या.

१८. हे म्हणणे खरे नाही की, मी गरोदर असतेवेळेस माझा सर्व संपुर्ण खर्च व औषधोपचाराचा खर्च गैरअर्जदार क्र. १ ने केला होता. माझा औषधोपचाराचा खर्च माझ्या आई-वडीलांनी केला होता. त्या खर्चाच्या अनुषंगाने मी माझ्या अर्जासोबत कोणते दस्ताऐवज दाखल केले हे मला माहीती नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.०१.२०२२ रोजी मला मुल जन्माला आले. हे म्हणणे खरे आहे की, त्याकरीता मला डॉ. बडवाईक यांच्या दवाखाण्यात भरती करण्यात आले होते. हे मला माहीती नाही की, त्यावेळी देखील दवाखाण्याचा संपुर्ण खर्च गैरअर्जदार क्र. १ ने केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मुलगा झाल्यामुळे दोन्ही कुटूंबात आनंदाचे वातावरण होते. हे म्हणणे खरे आहे की, बाळंतपणानंतर मला काही दिवस आई-वडीलांकडे आराम करण्यासाठी जावे असे वाटत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ने मला आई व मावशी कडे नेऊन सोडले होते. हे म्हणणे खरे नाही की, तिथे मी जवळपास एक ते दिड महिना राहीली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला परत घेऊन जाण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ ने मला फोन देखील केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर १५ दिवसानंतर गैरअर्जदार क्र. १ हा मला परत घेऊन जाण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, परंतु मी गैरअर्जदार क्र. १ सोबत गेली नव्हती.

२०. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दोन-तीन दिवसांनी गैरअर्जदार क्र. १ व त्याची आई माझ्या आई-वडीलांकडे मला घेऊन जाण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस देखील मी त्यांच्यासोबत गेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या आई-वडीलांकडे जवळपास चार महिने राहीली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५.११.२०२२ रोजी एक मिटींग घेण्यात आली होती. त्या मिटींगला देवेंद्र बोरकर, गिता बोरकर, भिमराव रामटेके, जितेंद्र गेडाम, चंद्रप्रभाबाई गेडाम इतके लोकं

हजर होते व गैरअर्जदाराकडुन कोण-कोण हजर होते हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिटींगमध्ये मला व गैरअर्जदार क्र. १ ला समजुन सांगण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिटींगमध्ये आम्ही दोघांनी आपापल्या चुका मान्य करुन आमचा संसार परत सुरु केला. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ सोबत राहत असतांना गैरअर्जदार क्र. १ हा मला दैनंदीन लागणाऱ्या गरजा पुर्ण करीत होता.

**२१.** हे मला माहीत नाही की, गैरअर्जदार क्र. १ हा माझ्या दैनंदीन गरजा पुर्ण करीत नसल्यामुळे मी तंटामुक्ती समीती, पोलीस स्टेशन किंवा महिला समुपदेशन केन्द्र येथे तक्रार केली किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. १ च्या घराला लागुन इतर लोकांची देखील घरे आहे. हे मला माहीत नाही की, गैरअर्जदार क्र. १ व त्याच्या घरातील लोकं आजुबाजुला लोकांच्या मदतीसाठी धावुन जातात. हे म्हणणे खरे नाही की, शेजारील लोकं देखील गैरअर्जदार क्र. १ व त्याच्या कुटुंबाला मदत करीत असतात.

**२२.** माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ मध्ये लिहीलेल्या घटनेबाबत मी गैरअर्जदार क्र. १ च्या घराच्या शेजारील राहणाऱ्या लोकांना सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमुद घटनेनंतर मी माझ्या वडीलांसोबत माहेरी निघुन गेली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी वडीलांच्या घरी ८ दिवस राहीली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांच्या घरी राहत असतांनी गैरअर्जदारांनी मला फोन करुन परत येण्यासंबंधी कळवीले होते. हे मला माहीती नाही की, परंतु मी गैरअर्जदाराला कोणत्याही प्रकारे प्रतीसाद दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने परत फोन केल्यानंतर मी गैरअर्जदारांना सांगीतले की ''पाच पंच लोक घेऊन आले तरच मी यायला तयार आहे''. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या वडीलांच्या घरी परत मिटींग घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिटींग मध्ये मला विचारण्यात आले होते की, 'तुम्हाला वेगळे राहायचे आहे की संसार

करायचे आहे'. हे मला माहीत नाही की, गैरअर्जदार क्र. १ ने त्याचा संसार टिकावा म्हणुन त्याला संसार करायचा असल्याचे सांगीतले होते. हे मला माहीत नाही की, त्या दिवशी गैरअर्जदार क्र. १ व माझ्याकडुन कोणतीही लिखापढी करुन घेण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिटींग नंतर मी व गैरअर्जदार क्र. १ पुन्हा एकत्र राहु लागले.

**२३.** सध्या मी माझ्या आजोबांकडे राहत आहे. मी माझ्या माहेरी राहत नाही. माझ्या शपथपत्रातील मजकुर, ''गैरअर्जदार यांच्याद्वारे होणाऱ्या दररोजच्या या अश्या शारीरीक व मानसीक घरेलु त्रासाने कंटाळुन शेवटी दिनांक २२.०१.२०२४ रोजी पासुन मी मुलासह माहेरी राहत आहे'' हा मजकुर खरा आहे. माझे माहेर एरंडीदेव, तालुका मोरगाव अर्जुनी जिल्हा गोंदीया येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण दाखल करतेवेळेस देखील मी माझ्या वडीलांकडे माहेरीच राहत होती. माझ्या शपथपत्रातील मजकुर, ''गैरअर्जदार यांच्याद्वारे होणाऱ्या दररोजच्या या अश्या शारीरीक व मानसीक घरेलु त्रासाने कंटाळुन शेवटी दिनांक २२.०१.२०२४ रोजी पासुन मी मुलासह माहेरी राहत आहे'' हा खरा आहे किंवा कसे हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा अर्ज दाखल करेपासुन ते माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल करेपर्यंत माझ्या माहेरीच राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, विद्यमान कोर्टाची दिशाभुल करुन मी सदर प्रकरण सदर न्यायालयात दाखल केले.

**गैरअर्जदार यांच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन अर्जदार यांचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष

Digitally signed by PRAVIN PRABHULAL YADAV

(**प्रविण पी. यादव**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, लाखांदुर.

लाखांदुर
दि. २१/०२/२०२६.